RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १७] बुधवार, जून १७, २०२६/ज्येष्ठ २७, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. .. .. .. .. .. .. | **पृष्ठे** १-४ |


**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १७ जून २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No IX OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि, ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; १८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश, "मुंबई महानगरपालिका अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १८८८ चा ३.

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. ९.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. ९.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले २०२६ चा महा. अध्या. ९.

असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

**५.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१ब) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

२०२६ चा महा. अध्या. ९. "परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा

१९६५ चा महा. ४०. **६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९अ मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६५ चा अधिनियम महाराष्ट्र क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

२०२६ चा महा. अध्या. ९. "परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

**७.** महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६५ चा अधिनियम महाराष्ट्र क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

२०२६ चा महा. अध्या. ९. "परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

## निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याची कलमे ५ब व ३७, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याची कलमे ५ब व १९ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याची कलमे ९अ व ५१-१ब यांमध्ये अशा तरतूदी आहेत की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी पालिका सदस्य, महापौर किंवा अध्यक्ष यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील.

**२.** तथापि, वर निर्दिष्ट केलेल्या कलमांतील परंतुकांन्वये, उमेदवारांना, राखीव जागेवर निवडणूक लढविण्यासाठी नामनिर्देशन पत्रांसोबत, वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी पडताळणी समितीकडे दाखल केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा त्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि त्यांच्या निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करतील, असे हमीपत्र सादर करण्याची परवानगी आहे. असे वैधता प्रमाणपत्र, विनिर्दिष्ट केलेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करण्यात कसूर केल्यास परिणामी, अशा व्यक्तींची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होते आणि त्या पालिका सदस्य, महापौर, किंवा यथास्थिती, अध्यक्ष हे पद धारण करण्यास अपात्र ठरतात.

**३.** डिसेंबर, २०२५ व जानेवारी, २०२६ या महिन्यांमध्ये एकाच वेळी अनेक नगरपालिकांच्या निवडणुका घेण्यात आल्याने, जात पडताळणी समित्यांवर जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याच्या व वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कामाचा अत्याधिक भार पडला आहे. त्यामुळे, अशा निवडणुकींमध्ये निवडून आलेल्या पालिका सदस्यांना विनिर्दिष्ट कालमर्यादेत जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यात अडचणी येत आहेत. निवडून आलेल्या ज्या पालिका सदस्य, महापौर किंवा अध्यक्ष यांना पडताळणी समितीसमोर त्यांचे अर्ज प्रलंबित असल्यामुळे, अद्याप वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही, त्यांनी वैधता प्रमाणपत्र विनिर्दिष्ट कालमर्यादेत सादर केलेले नाही, या कारणावरून अपात्र ठरणार नाहीत याची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. म्हणून, संबंधित नगरपालिका कायद्यांच्या वर निर्दिष्ट केलेल्या कलमांमध्ये सुयोग्य सुधारणा करून, अशा निवडून आलेल्या पालिका सदस्य, महापौर व अध्यक्ष यांना वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याची, तरतूद करणे इष्ट आहे, असे वाटते.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १७ जून २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.